Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३१] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १६-२२, २०२१/भाद्रपद २५-३१, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३६.

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ च्या अनुषंगाने कलम २३ (१) नुसार सेवाग्राम (बि.न.प.) क्षेत्राची विकास योजना सुधारित करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत**

क्रमांक जिपव-ग्रापं-अनुदान-सेविआ-वशि-१७७३-२०२१.—

सेवाग्राम (बि.न.प) क्षेत्राची विकास योजना मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अधिसूचना क्र.वि.यो. सेवाग्राम (बि.न.प.)-टीपीव्ही-६-७६९१, दिनांक १९-१२-१९८९ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १५-०७-१९९० पासून अंमलात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ मधील तरतुदीनुसार विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून २० वर्षाचे आंत विकास योजना सुधारित करणे आवश्यक आहे ;

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ च्या अनुषंगाने कलम २३ (१)अन्वये वर्धा जिल्हा परिषदेने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.०६, दिनांक २३-०६-२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे ;

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (२) नूसार सेवाग्राम (बि.न.प) विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा वर्धा जिल्हा परिषदेच्या/ग्रामपंचायत सेवाग्राम, वरूड,बरबडी, कामंठवाडा, नांदोरा कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे ;

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल ;

**डॉ. सचिन ओम्बासे,** (भा.प्र.से),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

वर्धा :
दिनांक ३० ऑगस्ट २०२१.



ना.-एक-अ-१ (१६०५).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३७.

BY CHIEF EXECUTIVE OFFICER, ZILLA PARISHAD

**Declaration of Intention prepare Revised Development Plan of Sewagram (N.M.C.) as per Section 23 *(1)* read with Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. ZPW-GP-F-SDP-WS-1773-2021.—

The Development Plan of Sewagram (N.M.C) has been sanctioned by the Director of Town Planning Maharashtra State, Pune *Vide* Notification No. D.P. Sewagram (N.M.C.)/TPV-vi/7691, date 19/12/1989 and came into force *w.e.f.* date 15/07/1990. As per the Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 Development Plan has to be revise at least once in twenty years from the dated on which a Development Plan has come into operation.

Hence, the Zilla Parishad, Wardha by its Resolution No.-06, dated 23/06/2021 has given consent to declare its intention to revise Sewagram (N.M.C.) Development Plan as per provision of Section 23 *(1)* read with Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The Plan Showing boundary of the area included in Development Plan of Sewagram (N.M.C.) is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of Zilla Parishad, Wardha/Gram Panchayat, Sewagram, Warud, Barbadi, Kamathwada, Nandora as per required under Section 23 *(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestion/ objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Executive Officer, Zilla Parishad, Wardha within a period of 60 *(Sixty)* days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Dr.SACHIN OMBASE, (I.A.S),
Chief Executive Officer,
Zilla Parishad, Wardha.

Wardha :
Dated the 30th August 2021.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३८.

**सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) अन्वये सूचना**

क्र. प्रा.यो. नागपूर-मौजा-मानेगाव/ता.सावनेर-स.क्र. १५४-१-A,१५५,१५६/`B/१,१५७,१५८,१५९,१६०,१६१,१६२ A/२/३,१६२/A/३,१६२/C/३ व मौजा माळेगाव-ता.सावनेर-स.क्र. ४१३, ४१४, ४१५, ४१६/कलम-२० (३)/सहसंचानाग/८८९-२०२१.—

ज्याअर्थी, नागपूर प्रदेशाची सुधारित प्रादेशिक योजना (यापुढे "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे ) चे कलम १५ अन्वये शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्र.टिपीएस-२४९६-१५०५-प्र.क्र. २७३-९६-नवि-९, दि. ०६ मे २००० अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १५ जुलै, २००० पासून अंमलात आली आहे ;

ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणा-या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५ नवि-१३, दिनांक ०६-०५-२०१५ अन्वये शासनाने निदेश दिलेले आहेत व शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र. ४९-१५-नवि-१३, दिनांक ०४-०१-२०१६ अन्वये उक्त कार्यपद्धतीसंबंधी सुधारित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५१ (१) अन्वये प्राप्त शक्तीचा वापर करून शासनाचे

समक्रमांकाचे दिनांक ०६-०५-२०१५ चे अधिसूचने अन्वये अटींचे अधिन राहून, नागपूर प्रशासकीय विभागाकरीता सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा.संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर मंजूर नागपूर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावित जमीन वापर नकाशानुसार मौजा मानेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर येथील स. क्र. १५४/१A, १५५, १५६/B/१, १५७,१५८,१५९,१६०,१६१,१६२ A/२/३,१६२/A/३,१६२/C/३ मधील क्षेत्र ११.२१ हे. आर व मौजा-माळेगाव, ता.सावनेर, जि. नागपूर येथील स.क्र. ४१३, ४१४, ४१५, ४१६ मधील क्षेत्र ४.० हे. आर. असे एकूण क्षेत्र १५.२१ हे. आर क्षेत्र (यापुढे ज्यास "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे) प्रादेशिक योजनेच्या कृषी विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोटकलम (२) मधील तरतुदींनुसार "उक्त क्षेत्र" "कृषी" विभागातून वगळून, खालीलप्रमाणे अटींचे अधीन राहून, "रहिवास" विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे उक्त शासन निर्णयान्वये गठीत "प्रस्ताव छाननी व मंजुरी समिती" चे मत झाले आहे;

(१) अर्जदाराने उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे व नियमानुसार अधिमूल्य भरणा करणे बंधनकारक राहील.

(२) प्रस्तावित फेरबदलाखालील जागेलगत विद्यमान औद्योगिक वापराच्या अनुषंगाने सदर जागेत अभिन्यास मंजूर करताना २३.० मी. रूंदीचा बफर झोन सोडण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(३) पुरेसा पाणी साठा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण यांचे दिनांक १३-०८-२०२० रोजीच्या पत्रामध्ये केलेल्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील.

त्याअर्थी, आता, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० पोट-कलम (३) अन्वये प्रस्तावित फेरबदल अनुषंगाने नागरिकांकडून हरकती व सूचना योग्य त्या कारणांसह ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहे.

हरकती/सूचना सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा,नागपूर, पत्ता–प्रशासकिय इमारत क्र.१. दुसरा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर, ४४० ००१ यांच्याकडे पाठविण्यात याव्यात. विहीत मुदतीत प्राप्त होणा-या सूचना/हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे;

प्रस्तावित फेरबदलाची सूचना खालील कार्यालयामध्ये कामकाजाच्या दिवशी एक महिन्याचे कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

१. जिल्हाधिकारी, नागपूर.

२. सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

३. सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर.

सदर सूचना **www.maharashtra.gov.in** व **www.dtp.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

**रा. दा. लांडे,**
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
नागपूर विभाग, नागपूर.

नागपूर :
दिनांक ३० ऑगस्ट २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३९.

BY MEMBER SECRETARY, ZONE CHANGE COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

**Notice u/s-20 *(3)* Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. R.P.Nagpur -Mouza Manegaon-Tah. Saoner-Survey No. 154/1A, 155,156/B/1, 157, 158, 159, 160, 161, 162 A/ 2/ 3, 162 /A/3, 162/C/3 & Mouza Malegaon/Tah. Saoner/ S. No. 413, 414, 415, 416/Section 20 (3)/JDTP/889-2021.—

Where as, the Revised Regional Plan of Nagpur Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No.TPS-

2496/1505/CR-273/96/UD-9, Dated the 6th May, 2000 under Section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and has come into force with effect from the 15th July, 2000;

Whereas, Government *vide* Resolution No. TPS 1815/CR-49/15/UD-13, dated 6th May,2015 issued directive under Section 154 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act for making changes in the use of land in the ares of sanctioned Regional Plans under the said Act and issued order to follow revised procedure related to above directives *vide* Govt. Resolution No. TPS-1815/C.No.49/15/UD-13, Dated-04.01.2016; and in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 151 of the said Act, the Government *vide* its notification No. TPS-1815/CR-49/15/UD-13, Dated 06/05-2015, delegated the powers exercisable by it under the provisions of Section 20 *(3)* & 20 *(4)* of the said Act, (subject to conditions mentioned therein) to the Divisional Joint Director of Town Planning for Nagpur Administrative Division;

And whereas, land admeasuring approx 11.21 hectare bearing Survey No. 154/1/A, 155, 156/B/1, 157, 158, 159,160, 161, 162 A/ 2/ 3, 162 /A/3, 162/C/3 of Mouza- Manegaon, Tah. Saoner, District-Nagpur & land admeasuring approx 4.0 hectare bearing Survey No. 413, 414, 415, 416 of Mouza- Malegaon, Tah. Saoner, District- Nagpur total land admeasuring approx 15.21 hectare (hereinafter referred to as "the said Area") is included in 'Agriculture Zone' of proposal Land Use Plan in the sanctioned Regional Plan of Nagpur;

And whereas, the "Proposal Scrutiny & Sanctioning Committee" established under the above mentioned Government Resolution, after consulting to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, is of the opinion that the said Area should be deleted from "Agriculture Zone" and should be included in "Residential Zone" in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 20 of the said Act, subject to following conditions---

(1) It will be binding for the applicant to pay requisite premium and to follow conditions laid down in the above said Government Resolutions.

(2) At the time of submission of layout plan, it will be binding for the applicant to propose minimum 23.0 mt. *wide* Buffer Zone with adjoining existing industry.

(3) It will be binding for the applicant's to follow recommendations prescribed in letter dated 13-08-2020 issued by Senior Geologist, G.S.D.A. regarding sufficient water availability.

Now, therefore, under the power delegated by the Govt. in this regard, suggestions/objections with reasons are invited from General Public in accordance with Notice u/s 20 (*3*) of said Act in respect of proposed modification within 30 days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government gazette;*

The suggestions and /or objections shall be addressed to the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur, Administrative Building No. 1., Second Floor, Civil Lines Nagpur; 440001. Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur is duly authorized to hear the suggestions/objections received within the stipulated period and to submit the report thereon;

The plan showing the proposed modification is kept open for inspection to the public during office hours on all working days for a period of one month in the following offices:-

(1) Collector, Nagpur

(2) Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur .

(3) Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur

*This notice is also available on website www.maharashtra.gov.in and www.dtp.maharashtra.gov.in.*

R. D. LANDE,
Member Secretary, Zone Change Committee
And Joint Director of Town Planning,
Nagpur Division, Nagpur.

Nagpur :
Dated the 30th August 2021.

## पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे

---

**१५**

---

**सोमवार, सप्टेंबर ६, २०२१/भाद्रपद १५, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २५.

**आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल.**

क्रमांक -मनपाना-नरवि-९०३-२०२१.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दिनांक ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४००-१६२८-सी.आर.-२००-नवि-९, दिनांक १०-०९-२००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक २१-०९-२००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी २००२ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्राअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषीत केलेले होते. तथापी, शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४-२०१९-नवि-९, दिनांक २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. त्यानंतर शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.१५४(भाग-१)/२०१९-नवि-१९, दिनांक ०९-०४-२०२१ अन्वये नागपूर महानगरपालिकेकडील असलेल्या ७ योजनेसाठी नियोजन प्राधिकरणाचे अधिकार पुनश्चः नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना प्रदान करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा-धंतोली, न. भू. क्र. ३२७, शिट क्र. २० बी, नझूल भूखंड क्र. ३०, खालील ९२५.०० चौ.मी. जागा रहिवासी विभागातून वगळून वाणिज्यीक विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत फेरबदल करण्याचे प्रस्तावित आहे.

सबब, सदर प्रस्तावातील फेर बदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव मौजा-धंतोली, न. भू. क्र. ३२७, शिट क्र. २० बी, नझूल भूखंड क्र. ३०, खालील ९२५.०० चौ.मी. जागा नागपूर शहराचे मंजूर विकास योजनेत रहिवासी वापराकरीता दर्शविलेली आहे. सदरहू

भूखंडाखालील जागा रहवासी विभागातून वगळून वाणिज्यीक विभागात अंर्तभूत करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये प्रस्तावित असून उपरोक्त प्रस्तावास नागपूर महानगरपालिकेचे मा. सभागृहाने ठराव क्र. ९८, दिनांक २२-०६-२०२१ नुसार उपरोक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नागपूर शहराच्या सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा महानगरपालिकेच्या नगर रचना विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी व सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त होतील त्यावर महानगरपालिकेकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

नागपूर :
दिनांक २७ ऑगस्ट २०२१.

**राधाकृष्णन बी.,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६.

## BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Modification under Section 37 of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.**

No. NMC-TPD-903-2021.—

Whereas, the Revised Development Plan of Nagpur City prepared under the provisions of Mahrashtra Regional and Town Planning Act, 1966, Section 31(*1*) has been partially sanctioned by the Govt. *vide* Urban Development Department Notification No. TPS-2496-2643-CR-300(a)-97-UD-9, Date 7th January 2000 and came into force from 1st March 2000. Excluded part of development plan has been sanctioned *Vide* Govt. Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, Dated 10th September 2001 and came into force from Date 21st September 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as the “Planning Authority” for Nagpur City except the area covered under seven schemes *vide* Govt. Notification No. TPS-2401-855-CR-76-UD-9, Date 27th February 2002.

However, as per the Government Notification No. TPS-2419-1419-CR-No. 154-2019-UD-9, Date 27th August 2019 under the Nagpur Improvement Trust Jurisdiction the Planning of the seven schemes under Nagpur Municipal Corporation has also been declared by the Government but as per the Govt. Notification No. TPS-2419-1419-CR-No.154 (Bhag-1)-2019-CR-9, Dated 09-04-2021 so the power has been given to implement seven projects under Nagpur Municipal Corporation and Nagpur Improvement Trust.

“In the sanctioned Development Plan of Nagpur City. The land bearing C.T.S. No. 327 at Mouza-Dhantoli, Nazul Plot No. 30, Area 925 Sqm. land to be deleted Residential Zone and included in Commercial Zone. As per Section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

The Nagpur Municipal Corporation has passed the Resolution No. 98, dt. 22-06-2021 has to make the aforesaid modificationn. The part plan of Development Plan of Nagpur City showing the aforesaid modification are kept open at the office of the Town Planning Deptt. of Nagpur Municipal Corporation for inspection by public during office hours on all working days. The suggestions and objections which may be received to Municipal Corporation in respect of the said modification to the Development Plan within a period of one month from the date of publication of this notice, will be heard by the Municipal Commissioner before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

Nagpur :
Dated the 27th August 2021.

RADHAKRISHNAN B.,
Commissioner,
Nagpur Municipal Corporation, Nagpur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.